क्र. पोउपा/शवाशा/प्रशा-१/ ९०८ /२०२३
पो. उपायुक्त शहर वाहतुक शाखा यांचे कार्यालय,
ठाणे. दि. ०१/०८/२०२३.

## —: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

**विषय :—** **मुंबई—नाशिक महामार्गावरील खड्डयांमुळे वाहतूक संथ गतीने होवून वाहतूक कोंडी निर्माण होत असल्याने वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणे करीता वाहतूक अधिसुचनेमध्ये सुधारणा होणे बाबत.**

**संदर्भ :—** **जा.क्र. OW/DCP TRAFFIC THANE/CP-THANE/NOTIFICATION/66/2018, दि. १०/०९/२०१८.**

*****

**ज्याअर्थी,** ठाणे शहर अंतर्गत परिसरातून राज्यांतर्गत व बाहेरील राज्यातून मुंब्रा बायपास मार्गे जे.एन.पी.टी. /कळंबोली, नवी मुंबई कडून तसेच मुंबई कडून भिवंडी/नाशिक/गुजरातकडे राज्य महामार्ग क्र. ३ अथवा घोडबंदर रोडने जड—अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात ये—जा होत असते.

२) **ज्याअर्थी,** मुंबई—नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाका ते पडघा दरम्यान दोन्ही वाहिन्यांवर मोठया प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. सदर मार्गावरून जड—अवजड व इतर प्रकारच्या वाहनांची नियमित वर्दळ होत असते. नमूद मार्गावर मोठया प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनांची वाहतूक संथ गतीने होवून दैनंदिन प्रवास करणारा नोकरदार वर्ग व चारचाकी खाजगी वाहने यांना दहा मिनिटांच्या प्रवासाकरीता सुमारे दोन तास लागत असल्याने सामान्य नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. मुंबई—नाशिक महामार्गावरील खारेगाव ते पडघा दरम्यान अतिवृष्टीमुळे तसेच समृद्धी महामार्गाचे काम सुरू असल्याने जुना नाशिक—मुंबई हायवेवरून एकाच वेळी जड—अवजड व छोटी वाहने जात असल्याने वाहतूक कोंडीमध्ये भर होवून सामान्य नागरिक आणि नोकरदारवर्ग वेळेत इच्छीत स्थळी पोहोचू शकत नाही. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

३) **ज्याअर्थी,** जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई मुंब्रा बायपास मार्गे येणाऱ्या व भिवंडी/नाशिक/गुजरात तसेच मुंबई कडून ठाणे शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड—अवजड वाहनांना ठाणे शहरातील रस्त्यांवर सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद' करणे आवश्यक आहे.

४) **ज्याअर्थी,** मी, **जय जीत सिंह, पोलीस आयुक्त, ठाणे शहर,** महाराष्ट्र शासन गृह विभाग एम.व्ही.ए.११६/सी. आर/३७/टी.आर.दि ०७/०९/११९६ चे अधिसुचनेनुसार मोटर वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करतो की, :—

**प्रवेश बंद —**

४.१) **जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई** कडून येणारी जड—अवजड वाहने कल्याण फाटा व शिळफाटा मुंब्रा बायपास मार्गे नाशिक गुजरात भिवंडीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड—अवजड वाहनांना **मुंब्रा बायपास मार्गे जाण्यास शिळफाटा येथे सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**सदर जड अवजड वाहनांना रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान वरील नमूद मार्गाने मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.**

४.२) जे.एन.पी.टी./कळंबोली नवी मुंबई उरण मार्गे महापे सर्कल कडुन शिळफाटा मार्गे गुजरात, भिवंडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड—अवजड वाहनांना **शिळफाटा येथे सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**सदर जड अवजड वाहनांना रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान वरील नमूद मार्गाने मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.**

CamScanner

४.३) मुंबई कडून आनंदनगर टोलनाका मुलुंड मार्गे ठाणे शहरात प्रवेश करणाऱ्या जड–अवजड वाहनांना **आनंदनगर टोलनाका येथे सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**सदर जड अवजड वाहनांना रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान वरील नमूद मार्गाने मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.**

४.४) **नाशिक कडून येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद –**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ – नाशिक कडून ठाणे शहरातून जे.एन.पी.टी., नवी मुंबईकडे जाणाऱ्या जड–अवजड वाहनांना **शहापूर येथे सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**सदर जड अवजड वाहनांना रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान वरील नमूद मार्गाने मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग –**

अ) शहापूर येथून राष्टीय महामार्ग क्र. ३ वरून डावे वळण घेवून – सापगाव – मुरबाड – कर्जत – चौक फाटा – डि पॉईट – जे.एन.पी.टी., नवी मुंबईच्या दिशेने जाण्यासाठी मार्गस्थ होतील.

४.५) **गुजरात कडून येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद –**

राष्टीय महामार्ग क्र. ८ – अहमदाबाद, गुजरात कडून नाशिक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **मनोर (टेन नाका) येथे सकाळी ०५:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**सदर जड अवजड वाहनांना रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान वरील नमूद मार्गाने मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग –**

ब) मनोर (टेन नाका) येथून डावे वळण घेवून – पोशेरी – पाली – वाडा नाका – शिरीष पाडा येथून डावे वळण घेवून – अबिटघर – कांबरे येथून उजवे वळण घेवून – पिवळी – केल्हे – दहागाव मार्गे वाशिंद येथून नाशिकच्या दिशेने मार्गस्थ होतील.

**सदर जड अवजड वाहनांना रात्रौ २३:०० ते सकाळी ०५:०० वा. दरम्यान वर नमूद मार्गाने मार्गस्थ होण्यास मुभा देण्यात येत आहे.**

**५) सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना प्रसिध्द झाले दिनांकापासून ३० दिवस नाशिक–मुंबई व मुंबई–नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाका ते पडघा पर्यंत रस्त्यावरील खड्डे संबधित प्राधिकरणाकडून बुजविण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.**

६) सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

७) सदरच्या अधिसुचनेचा भंग करणाऱ्या मोटर वाहन चालकाविरूध्द मोटर वाहन कायदा १९८८ कलम १७९(१) अन्वये कारवाई करण्यात येईल.

1.8-23

**(जय जीत सिंह)**
**पोलीस आयुक्त, ठाणे शहर.**

CamScanner

**<u>प्रति,</u>**
संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री, चर्नी रोड, मुंबई.
२/– आपणास विनंती करण्यात येते की, वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना सुधारणा केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**<u>प्रत,</u>**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– वरील संदर्भीय वाहतूक अधिसुचना रद्द केले बाबत तसेच माल वाहतूक करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गक्रमणाकरीता जारी करण्यात आलेलया वेळेबाबत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

**<u>प्रत मा. सविनय सादर</u>**
जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा.
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, मुंबई, ठाणे शहर, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

**<u>प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी,</u>**
पोलीस सह आयुक्त, वाहतूक विभाग, मुंबई.
अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण व ठाणे,
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पालघर व नवी मुंबई.
पोलीस अधीक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे, नवी मुंबई, मिरा–भाईंदर वसई–विरार.
पोलीस उप आयुक्त, विषेश शाखा, ठाणे शहर
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे, परिमंडळ–२ भिवंडी, परिमंडळ–३ कल्याण, परिमंडळ–४ उल्हासनगर, परिमंडळ–५ वागळे इस्टेट.

**<u>प्रत</u>** :– आयुक्त ठाणे, भिवंडी निजामपूर शहर, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका.
मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगाव बदलापूर नगर परिषद.

**<u>प्रत</u>** :– मुख्य व्यवस्थापक (वाहतूक), जे.एन.पी.टी. न्हावाशेवा, नवी मुंबई.

**<u>प्रत</u>** :– स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा ठाणे.

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना रद्द करण्यात आले बाबत नोटीस मध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– सर्व संबंधित वाहतूक संघटना.

CamScanner